# बहुजन समाजाचे उद्धारकर्ते कर्मवीर काकासाहेब वाघ



**सहकार, कृषी, शिक्षण व राजकारण या क्षेत्रात सामाजिक बांधिलकीचे भव्यदिव्य कार्य उभारणारे पद्मश्री काकासाहेब वाघ यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवन कार्याविषयीचा लेख..**

माझे आजोबा सयाजी बाबा हे 'वाघांच्या घरातील शिक्षित वारस' होते आणि काकासाहेब माझे वडिल होते. आमची आई सौ. गीताईंचे सौभाग्य होते. पण त्याहीपेक्षा ते नाशिकचेच भाग्य अधिक होते. त्यांनी शेतकरी आणि बहुजन समाजासाठी आयुष्यभर सक्रिय योगदान दिले.

पिंपळगांव येथील प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणाची सोय नसल्याने काका घरी शेतीवर परतले. एकदा पिंपळगावचे फौजदार डी. आर. भोसले, सामाजिक कार्यकर्ते गणपत दादा मोरे, वणीचे सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब थोरात रानवडला सयाजी बाबांकडे कामानिमित्त आले. तेव्हा काका तथा देवराम शेतात काम करीत होते. या मंडळींनी त्यांची हुशारी पाहून हा मुलगा बहुजन समाजाच्या शिक्षणाला उपयोगी ठरेल म्हणून मागून घेतला. नाशिकला आल्यावर ते शिक्षण क्षेत्रात सक्रिय झाले. काकांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत १९१८ ते १९७० असे प्रदीर्घ काळ सक्रिय योगदान दिले. पिंपळगाव बसवंत या मध्यवर्ती ठिकाणी वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यासाठी त्यांनी अडीच लाख रुपये उभारले. काकांच्या सत्तरी करिता जमा लोकवर्गणीतून त्यांनी दोन लाख रुपये घेऊन आवश्यक त्या मुदत ठेवीची पूर्तता केली. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हरिभाऊ पाटसकर यांची भेट घेऊन त्यांनी महाविद्यालयास परवानगी मिळविली. या महाविद्यालयाचे नामकरण 'कर्मवीर काकासाहेब वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय' असे केले गेले. १९५७ ते १९६२ यादरम्यान ते विधिमंडळ सदस्य अर्थात 'आमदार' होते. दूरदृष्टी ठेवून सहकारी तत्वावर त्यांनी निफाड, गिरणा, रानवड, नाशिक व कादवा कारखान्यांकरिता मंजुरी मिळवून दिली. काकासाहेबांच्या समाजाप्रती त्याग, समर्पण व कार्याची दखल घेत भारत सरकारने २६ जानेवारी १९७० रोजी त्यांचा 'पद्मश्री' हा सर्वोच्च किताब देऊन यथोचित गौरव केला.

- बाळासाहेब वाघ, अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

**26-10-2020, Divya marathi**

# कॅम्पस प्लेसमेंटवर परिणाम नाही

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

'कोविड-१९'मुळे शिक्षणक्षेत्रावर मोठा परिणाम झालेला असला, तरी महाविद्यालयांच्या कॅम्पस प्लेसमेंटवर फारसा परिणाम झालेला नाही. मार्चपूर्वी निवड झालेले बहुतांश विद्यार्थी संबंधित कंपन्यांमध्ये रुजू झाल्याची माहिती शहरातील विविध महाविद्यालयांमार्फत देण्यात आली. यंदाच्या वर्षी होणारे कॅम्पस इंटरव्ह्यू मात्र ऑनलाइन पद्धतीने होत आल्याचे या महाविद्यालयांनी सांगितले.

## बदलले केवळ मुलाखतींचे स्वरूप

दरवर्षी महाविद्यालयीन अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जुलै ते एप्रिल या महिन्यात कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले जाते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच संबंधित कंपन्यांमार्फत ऑफर लेटर दिले जाते. अंतिम वर्षाचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी कंपनीमध्ये रुजू होतात. परंतु, यंदा कोविड-१९ मुळे मार्चपासून सर्वच गोष्टींवर बंधने आल्याने मार्च २०२० पूर्वी कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण होते. ऑगस्टनंतर मात्र हळुहळू या कंपन्यांनी टप्प्या-टप्प्याने विद्यार्थ्यांना अंतिम वर्ष परीक्षेच्या निकालानंतर कंपनीत रुजू होण्याची संधी दिली आहे. अद्याप अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरू असल्याने निकालानंतर म्हणजेच साधारणतः डिसेंबर महिन्यात हे विद्यार्थी संबंधित कंपनीत रुजू होऊ शकणार आहेत.

शहरातील काही महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठीही कॅम्पस इंटरव्ह्यूचे नियोजन सुरू झाले आहे. यंदाच्या वर्षी गेल्या दोन महिन्यात जवळपास २२ कंपन्यांच्या कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आल्याची माहिती के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजच्या प्लेसमेंट विभागाने दिली. तसेच गेल्या महिन्याभरात ५ कंपन्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूबाबत विचारणा केल्याचे संदीप पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रशांत पाटील यांनी सांगितले.

### ऑनलाइन जॉईनिंगचा पर्याय

अनेक आयटी कंपन्यांनी निवड झालेल्या उमेदवारांना ऑनलाइन रुजू होण्याचा पर्याय दिला आहे. परंतु, अन्य क्षेत्रातील कंपन्यांना मात्र हा पर्याय वापरण्यावर बंधने असल्याने येथे डिसेंबरनंतरच उमेदवार रुजू होऊ शकतील. यावर्षी होणाऱ्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये ऑनलाइन इंटरव्ह्यू घेण्याला कंपन्या प्राधान्य देत आहेत. कॉलेजमध्ये येऊन इंटरव्ह्यू घेण्याऐवजी अनेक कंपन्या संबंधित उमेदवाराला कंपनीमध्ये इंटरव्ह्यूसाठी बोलावत आहेत.

27-10-2020. maharashtra times